# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**


**Case No: CGRF/AZ/U/135/2008/55/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Sau. Prabha Pandurang Bhandekar, Golwadi,Kanchannagar, Plot No.2, Fat No.,46,Maulinagar, CIDCO, Aurangabad. (Consumer No490011660336.)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from. Sau. Prabha Pandurang Bhandekar, Golwadi, Kanchannagar, Plot No.2, Fat No.,46,Maulinagar, CIDCO, Aurangabad.

The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of average reading.

You are requested to submit your reply on the grievance of the consumer at the time of hearing .

**The hearing in this matter is kept on 30/090/2008 at 13=00 hrs.**

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL.Aurangabad.**

**Encl As above**.

Copy to :
Sau. Prabha Pandurang Bhandekar,
Golwadi, Kanchannagar, Plot No.2,
Fat No.,46,Maulinagar, CIDCO,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१३४/२००८/५५**
**तक्रार दाखल दिनांक ;- २५/०९/२००८**
**निकाल दिनांक ;- ०४/११/२००८**

**सौ.प्रभा पांडुरंग भांडेकर,**
**रा.गोलवाडी कांचन नगर,गट नं.४६.**
**माऊली नगर सिडको, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११६६०३३६) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,)**
**औरंगाबाद. गैरअर्जदार**

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २५/०९/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ३०/०९/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार ते गोलवाडी या ग्रामीण भागात राहत असुन त्यांनी तीन वर्षा पुर्वी महावितरण वीज कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. अनेकदा पर्यत करून देखील त्यांच्या मिटरवरील रिडींगसाठी कोणीही आले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. महावितरण कंपनीतर्फे कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. महावितरण कंपनीच्या छावणी विभागाची संपर्क केल्यानंतर त्यांना १८७५०/-रूपयाचे वीज बिल देण्यात आले. या बिलाचे पार्टपेमेंट म्हणून त्यांनी रूपये १०,०२५/-भरले असल्याचे आपल्या तक्रारीत म्हटले आहे. महावितरण कंपनीकडुन त्यांना देण्यात आलेल्या चुकीच्या बिलाची तक्रार त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे केली पण त्यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असून सुधारीत वीज बिल देण्याबाबत तसेच चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत करू नये असा अंतरीम आदेश पारीत करण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) अर्जदाराने त्यांना देण्यात आलेल्या चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत करण्यात येवु नये याबाबत अंतरीम आदेश देण्याची विनंती मंचाने मान्य करत दिनांक ३०/०९/२००८ रोजी या प्रकरणी सुनावणी ठेवली.सुनाणीच्या वेळी अर्जदार प्रतिनिधी श्री पांडुरंग भांडेकर हजर होते. महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी किंवा त्यांचे अधिकारी प्रतिनिधी उपस्थित नव्हते.महावितरण वीज कंपनीतर्फे कोणतेच म्हणणे दाखल झालेले नसल्यामुळे व अर्जदाराने मंचासमोर सांगितलेल्या परिस्थिती लक्षात घेवुन अर्जदारास वीजे पासुन वंचित राहु नये म्हणुन नैसगिक न्यायप्रणालीनुसार अर्जदाराची तक्रार निकाली निघेपर्यत त्याचा वीज पुरवठा खंडीत करू नये असा अंतरीम आदेश पारीत केला व सुनावणीची पुढील तारीख ही १४/१०/२००८ अशी ठेवण्यात आली.

३) दिनांक १४/१०/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी आपला जवाब म्हणून अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिनांक १५/०२/२००८ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत मंचात दाखल केली. नोडल अधिकारी यांना त्यांनी घेतलेला निर्णय कोणत्या कागद पत्राच्या आधारावर घेतला याबाबत मंचाने विचारणा केली असता त्यांनी सी.पी.एल., स्थळ पाहणी अहवाल व इतर आवश्यक कागद पत्रे पुढील सुनावणीच्यावेळी देण्याचे मान्य केले. त्यामुळे मंचाने या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक २१/१०/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

४) २१/१०/२००८ रोजी अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी सुनावणीच्यावेळी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी सी.पी.एल.ची एक प्रत मंचात दाखल केली. मंचाने स्थळ पाहणी अहवाल, मीटर बदलीचा अहवाल हे उपलब्ध नसल्याचे सांगितले. मंचाने नोडल अधिकारी यांना ही कागद पत्रे दिनांक २२/१०/२००८ रोजी मंचात दाखल करण्याचे आदेश दिले व प्रकरण निकालासाठी राखुन ठेवले.

५) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरून असे आढळुन येते की, अर्जदारास महावितरण कंपनीकडुन दिनांक ३०/०६/२००६ रोजी घरगुती वापरासाठी वीज पुरवठा करण्यात आला, त्यावेळी त्यांच्याकडे बसविण्यात आलेला मिटरचा क्रमांक ०००५९९३९ असा होता. सी.पी.एल. चे निरीक्षण केल्यावर हे मीटर दि. ३०/०६/२००४ ते नविन मीटर लावण्यात आलेल्या तारखेपर्यत म्हणजेच ०१/१२/२००७ पर्यत कार्यरत होते. महावितरण कंपनीने या साडेतीन वर्षाच्या काळात लॉक स्टेटस दाखवत अर्जदारास अदांजे वीज बिल आकारणी केलेली दिसुन येते. सी.पी.एल. वरून मीटरवरील घेण्यात आलेल्या काही नोंदी व मिटर बदलतांना त्यावरील नोंद लक्षात घेता हे मिटर व्यवस्थितपणे कार्यरत होते हे आढळुन येते. महावितरण तर्फे रिडींग उपलब्ध करून योग्य ते बिल आकारण्याचा कोणताही प्रयत्न करण्यात आला नसल्याचे तसेच नोव्हेंबर २००७ मध्ये कोणतीही पुर्वसुचना

न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याचे दिसुन येते. अर्जदाराने पार्टपेमेंट रूपये १०,०००/- व रूपये २५/-पुर्नजोडणी रक्कम भरल्यानंतर त्याचा वीज पुरवठा पुन्हा सुरू करण्यात आल्याचे देखील आढळुन येते. दि. ०१/१२/२००७ रोजी जुने मिटर बदलण्यात आल्यानंतर देखील महावितरण कंपनीने नवीन मिटर (क्रमांक ७२१९७०) यावरील वीज वापराच्या नोंदीप्रमाणे वीज बिल न आकारता डिसेबर २००७ ते मार्च २००८ या काळातील १४८० युनिट व एप्रिल २००७ ते जुन २००८ या काळात २४९ युनिट वीज वापराचे कोणताही आधार न घेता वीज बिल आकारणी केली असल्याचे आढळुन येते जी चुकीची असल्याचे मंचाचे मत आहे.सी.पा.एल.वरून सप्टेबर २००८ मध्ये नवीन मीटरवर ४४१ अशी दाखविण्यात आलेली आढळते यावरून अर्जदाराचा वीज वापर हा दि.३०/०६/२००४ ते दि. ०१/१२/२००७ पर्यत (४०१२-१) ४०११ व दि.०२/१२/२००७ ते सप्टेबर २००८ पर्यत (४४१-१) ४४० युनिट असा असल्याचे आढळुन येते.

६) महावितरण कंपनीच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिलेला दि.१५/०२/२००८ रोजीच्या निर्णयात अर्जदाराने गेल्या साडे तीन वर्षात मिटर रिडींग घेण्यात कोणीच आले नाही या तक्रारीबाबत संबंधीत छावणी विभागाने कोणताही खुलासा केलेला नसला तरी अर्जदारास व्याज व दंडासहीत देण्यात आलेले वीज बिल योग्य असल्याचे म्हटले आहे.मंच अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाच्या या निर्णयासी सहमत नसुन योग्य वेळी मिटर रिडींग न घेणे व ग्राहकास सतत चुकीच्या वीज बिलाची आकारणी करणे ही सेवेतील त्रुटी मानते.व या प्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास ३०/०६/२००४ ते ०१/१२/२००७ या काळातील ४०११ युनिट वीज वापराचे बिल विभागुन द्यावे.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास ०२/१२/२००७ ते सप्टेबर २००८ या काळातील एकुण ४४० युनिट वीज वापराचे वीज बिल विभागुन देण्यात यावे.

३) वरील प्रमाणे वीज बिल विभागणी केल्यावर महावितरण कंपनीने अर्जदारास ३० दिवसाच्या आत सुधारीत वीज बिल द्यावे.

४) वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल देताना कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

५) अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची तसेच पुर्वसुचना न देता वीज पुरवठा खंडीत करून पुर्नजोडणीसाठी घेतलेली रूपये २५/-रक्कमेची वजावट करावी.

६) महावितरण कंपनीने मीटर रिडींग न घेता सतत चुकीचे वीज बिल आकारून तसेच कोणतीही पुर्वसुचना न देता वीज पुरवठा खंडीत करून वीज कायदा २००३ मधील तरतुदीचे उल्घंन केल्यामुळे अर्जदारास रूपये ५००/- नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१३४/२००८/५५** **दिनांक ;-**

**प्रति,**
**सौ.प्रभा पांडुरंग भांडेकर,**
**रा.गोलवाडी कांचन नगर,गट नं.४६.**
**माऊली नगर सिडको, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११६६०३३६)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१३४/२००८/५५ )

आपण दिनांक २५/०९/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**